# श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई - ४०००२८

S. K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-400028 ( Controlled by Govt. of Maharashtra)

Tel : 022 - 2422 4438 Fax : 022 - 2422 1558 www.siddhivinayak.org admin@siddhivinayak.org


## प्रथम मुदतवाढ दरपत्रके मागविण्यासंदर्भातील सूचना

**विषय:– माघी श्री गणेश जयंती उत्सव कालावधीत (७ दिवस) भोजन तयार करावयाच्या मजुरीबाबत**

माघी श्री गणेश जयंती उत्सव कालावधीत (७ दिवस) भोजन तयार करण्याच्या मजूरीबाबत सिलबंद दरपत्रके मागविण्यात येत आहेत. याबाबतची संपूर्ण माहिती, अटी व शर्ती न्यासाच्या www.siddhivinayak.org या संकेतस्थळावर अपलोड करण्यात आली आहे.

**अटी व शर्ती**

१) दरपत्रकात नमूद दिवसांकरीता भोजन बनविण्याच्या कामाचे दरपत्रक स्विकारल्यानंतर रविवार दि. २२ जानेवारी, २०२३ पासून ते शनिवार दि. २८ जानेवारी, २०२३, या कालावधीपर्यंत काम करणे आवश्यक आहे.

२) दरपत्रकामध्ये नमूद दिवसांकरीता मजूरीचे दर नमूद करणे आवश्यक आहे.

३) दरपत्रकामध्ये सर्व समावेशक खर्चासह मूळ दर असावा व कर अतिरीक्त असा उल्लेख करावा.

४) प्रत्येक कंत्राटदाराने फक्त १ दरपत्रक सादर करावे.

५) कंत्राटदाराने GST क्रमांक दरपत्रकात नमूद करावा.

६) स्वयंपाकाकरीता लागणारा सर्व कच्चा माल (किराणा माल), भाजीपाला व गॅस न्यासातर्फे कंत्राटदारांना पुरविण्यात येईल.

७) अल्पोपहार व भोजन बनविण्याच्या संपूर्ण पूर्वतयारीसह स्वयंपाक वाढणे, ताटे–भांडी धुणे, चपात्या/पुरी करणे व इ. कामे करणे तसेच स्वयंपाकाकरीता लागणारी सर्व भांडी, गॅस शेगडया, टेबल–खुर्च्या (कव्हर सहीत) कंत्राटदारास आणावी लागतील.

८) कंत्राटदारास देयकाची रक्कम फर्मच्या नावे R.T.G.S. ने अदा करण्यात येईल.

९) कोणतीही कारणे न देता दरपत्रक स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार न्यासास असेल.

१०) उपरोक्त शर्ती व अटीत काही बदल, सुधारणा करण्याचा, शिथिल करण्याचा वा जादा अटी शर्ती विहीत करण्याचा अधिकार न्यास व्यवस्थापनाने राखून ठेवलेला आहे. आपली कोणतीही अट/अटी न्यासावर बंधनकारक राहणार नाहीत.

११) दरपत्रकधारकाने मोहरबंद दरपत्रकासोबत साक्षांकीत करुन सादर करावयाची कागदपत्रे

अ) आयकर नोंदणी पॅनकार्ड

ब) सेवाकर जी एस टी नोंदणी दाखला

१२) सिलबंद लखोटयावर दरपत्रक सूचना दिनांक व सूचनेत नमूद विषयाचा उल्लेख करण्यात यावा.

१३) दरपत्रके सिलबंद लखोटयात **शुक्रवार, दि. १३.०१.२०२३ रोजी सकाळी ११.०० वाजेपर्यत** न्यासाच्या तिसऱ्या मजल्यावरील नोंदणी शाखेत सादर करावीत.

१४) **शुक्रवार, दि. १३.०१.२०२३ रोजी दुपारी १२.००** वाजता तिसऱ्या मजल्यावरील समिती कक्षात दरपत्रके उघडण्यात येतील. दरपत्रके उघडण्याच्या वेळी कंत्राटदार किंवा त्यांचे अधिकृत प्रतिनिधी यांनी कृपया उपस्थित रहावे.

(नंदा मा. राऊत)

कार्यकारी अधिकारी